

# डॉ. व्ही. एम. पेशवे सामाजिक संशोधन संस्था

## यवतमाळ

डॉ. व्ही. एम. पेशवे सामाजिक संशोधन संस्था, यवतमाळ संस्थेची उभारणी २०१० मध्ये प्रा. राम बुटले, डॉ. राम जाधव यांनी त्यांना घडविलेल्या पेशवे सराच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याकरीता उभी केली. डॉ. व्ही. एम. पेशवे यांचे अध्ययन, अध्यापन व लेखन क्षेत्रातील कार्य पूर्णतः 'मानवी हक्कांशी' निगडीत होते. त्यांनी मानवी हक्कांच्या बाबतीत रूजविलेला विचार पुढे नेण्याकरीता सरांच्या स्मृती प्रित्यर्थ दरवर्षी एक राष्ट्रीय परिषद घेण्याचा मानस व्यक्त करून सुरूवात केली. परिषद मानवी हक्क या विषयाशी संबंधित असून यामध्ये राज्यशास्त्राचे प्राध्यापक (अमरावती, नागपूर, गडचिरोली विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयात कार्यरत) संशोधक विद्यार्थी व विभिन्न क्षेत्रात कार्यरत मान्यवर आमंत्रित असतात.

परिषदेतील सहभाग पूर्णतः नि:शुल्क असतो. परिषदेला लागणारा खर्च राम बुटले, राम जाधव, संदीप तुंडूरवार, नागेश्वर कन्हाके, वकील शेख, शरद सांबारे यांच्या सहकार्यातून करण्यात येतो. मानवी हक्कांच्या विभिन्न पैलूंवर प्रकाश टाकण्याकरिता तज्ज्ञ, अनुभवी, प्रत्यक्ष कार्यानुभव असणाऱ्या आदरणीय व्यक्तिंना आजपर्यंत उद्‌बोधनाकरिता आमंत्रित करण्यात आले. यामध्ये डॉ. अलका देशमुख, प्रा. न. मा. जोशी, ॲड. असिम सरोदे, श्री. हरीष अडयाळकर, श्री. चंद्रकांत वानखेडे, श्री. दादाजी खोब्रागडे, देवेंद्र गावंडे, देवाजी तोफा, श्रीपाद अपराजीत,अविनाश दुधे, डॉ. श. गो. देवगावकर, डॉ. किशोर रीठे डॉ. उत्तम रूद्रवार, डॉ. पंकज चांदे या मान्यवरांचा समावेश राहिलेला आहे. यावर्षी मतीन भोसले यांची उपस्थिती होती.

२०१२ च्या राष्ट्रीय परिषदेपासून मानवी हक्कांच्या क्षेत्रात कार्यरत व्यक्तिंना 'राष्ट्रीय पुरस्कार' देण्यास सुरूवात केली. रोख पाच हजार रूपये पूर्वी होते, नंतर दहा हजार व या वर्षी २५००० रू. राशी मानपत्र व सन्मानचिन्ह असे याचे स्वरूप आहे. ॲड. असीम सरोदे, श्री. दादाजी खोब्रागडे, श्री. देवाजी तोफा ॲड. पारोमिता गोस्वामी, डॉ. किशोर रीठे, श्री मतीन भोसले यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावर्षी शांतता

व सद्भाव या क्षेत्रात कार्यरत श्री संजय नहार या समाजव्रतींना पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

संशोधन संस्थेने पहिली परिषद यवतमाळ येथे घेतली. पहिल्या तीन परिषदा यवतमाळ येथील वेगवेगळया महाविद्यालयात आयोजिण्यात आल्यात, नागपूर येथे दोन राष्ट्रीय परिषदा घेण्यात आल्यात तर कोराडी येथील महाविद्यालयात एक परिषद घेण्यात आली. पुसद येथे एक व सेलु येथील महाविदयालयात एक या वर्षी ही परिषद श्री बिंझाणी नगर महाविद्यालय येथे पार पडत आहे. संस्थेचा निरपेक्ष उद्देश इतकाच की, मानवी जीवनाच्या विभिन्न पैलूंविषयीचे उद्बोधन ख्यातनाम आणि निरलस कार्य करणाऱ्या व्यक्तिंकडून मिळवयास हवे. त्या अनुषंगानेच मानवी हक्कांच्या क्षेत्रात प्रभावी कार्य करणाऱ्या व्यक्तिंना परिषदेच्या व्यासपीठावर आमंत्रित करून त्यांचा यथोचित सन्मान करण्याची परंपरा डॉ. व्ही. एम. पेशवे सरांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रारंभ केली आहे.

३१ मार्च २०१९ रोजी संपन्न होणारी परिषद नववी आहे. आतापर्यंत आयोजित करण्यात आलेल्या परिषदा, स्थान व विषय नमूद केलेले आहेत.

| अ. क्र. | वर्षे | विषय | स्थान | पुरस्कार |
|---|---|---|---|---|
| १) | १२ ऑक्टो. २०१० | मानवी हक्क : जनसमूहाच्या कल्पना | दाते महाविद्यालय, यवतमाळ | — |
| २) | ३१ मार्च २०१२ | मानवी हक्क व स्त्री प्रश्नांची बाजू | अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ | — |
| ३) | ७ मार्च २०१३ | मानवी हक्क आणि जनहित याचिका | अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ | ॲड. असीम सरोदे |
| ४) | ३० मार्च २०१४ | अन्नधान्य सुरक्षा आणि मानवी हक्क | लोहिया अध्ययन केंद्र, नागपूर | श्री.दादाजी खोब्रागडे |
| ५) | ८ मार्च २०१५ | आदिवासी आणि मानवी हक्क | जुने मॉरिस कॉलेज व.ना. शा.स.वि.सं. नागपूर | श्री. देवाजी तोफा |
| ६) | १० जाने. २०१६ | व्यसनमुक्ती आणि मानवी हक्क | तायवाडे महाविद्यालय, कोराडी | ॲड.पारोमिता गोस्वामी |
| ७) | १५ जाने. २०१७ | पर्यावरण आणि मानवी हक्क | श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद | श्री. किशोर रीठे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | १० डिसे. २०१७ | शिक्षण आणि मानवी हक्क | यशवंत महाविद्यालय, सेलू | श्री मतीन भोसले |
| ९ | ३१ मार्च २०१९ | गांधी आणि मानवी हकक | श्री बिंझाणी नगर महाविद्यालय नागपूर | श्री संजय नहार |

परिषद तीन सत्रात आयोजिण्यात येते परंतु सत्र सलग चालविले जातात. उद्घाटन, बिजभाषण व पुरस्कार विमोचनाचे पहिले सत्र, दुसऱ्या व तिसऱ्या सत्रातून विषयाशी संबधित पैलूंवर भाष्य करण्याकरीता तज्ज्ञ व्यक्तिंना आमंत्रीत केले जाते. समारोपीय कार्यक्रमानंतर प्रमाणपत्र वितरण केले जाते. मागील चार वर्षापासून विषयाशी संबंधित लेखांचे पुस्तक प्रकाशित करण्यात येत आहे. अध्ययन, अध्यापन, संशोधन क्षेत्रात कार्यरत व्यक्तिंकडून लेख मागविले जातात. प्रकाशीत पुस्तक उपस्थितांना वितरीत केले जाते. स्नेहभोजनाने परिषदेची सांगता केली जाते.

पूर्णपणे नि:शुल्क परिषदेच्या या आयोजनामधून उपस्थितापर्यंत बहूमूल्य संदेश पोहचविणे हा महत्वपूर्ण उद्देश आहे. या उद्देशाला प्रमाण ठेऊन पुढील वाटचाल संस्था करीत आहे. परिषदेचे आयोजन करतांना कुणाकडूनही निधी घेतला जात नाही वा उभा केला जात नाही. परिषद घेणारी मंडळी आपल्या स्वखर्चातून परिषदेचा पूर्ण खर्च करीत असते. राजकीय व इतर तत्सम संस्थाकडून कुठल्याही प्रकारचे सहकार्य न घेता अतिशय उत्तम रितीने परिषदेचे आयोजन करावयाचे हे आठावे वर्ष आहे. संस्थेच्या माध्यमातून खूप मोठे वा प्रचंड प्रभावी कार्य होत नाही, परंतु मान्यवरांच्या उद्बोधन, मार्गदर्शनातून बौध्दिक क्षेत्रात कार्यरत वर्गापर्यंत चांगला, प्रासंगिक आणि यथार्थपूर्ण संदेश पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न मात्र होतो आहे. परिषदेतील उपस्थिती त्यादृष्टीने आम्हाला बळ देणारी आणि प्रामाणिक कार्याची पावती वाटते. डॉ. व्ही. एम. पेशवे सरांनी अतिशय निरलस भावनेने विद्यार्थी घडविले. त्यांच्या निरलस, निरपेक्ष व दातृत्व भावनेप्रती कृतज्ञता म्हणून परिषदेच्या माध्यमातून सरांच्या स्मृती चिरंतन जपण्याचा हा अल्पसा प्रयत्न होय.

**विनित**

**डॉ. व्ही. एम. पेशवे सामाजिक संशोधन संस्था,**

यवतमाळ